Classified as Internal

# या आठवड्यात ५ नवीन म्युच्युअल फंड उघडणार

## केवळ १००० रुपयांपासून करता येणार गुंतवणूक

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

आज सोमवार, ५ मे पासून सुरू होणाऱ्या आठवड्यात एकूण ५ नवीन एनएफओ सबस्क्रिप्शनसाठी उघडणार आहेत. या एनएफओमध्ये एंजेल वन म्युच्युअल फंडच्या एंजेल वन निफ्टी ५० ईटीएफ आणि एंजेल वन निफ्टी ५० इंडेक्स फंड या दोन नवीन योजनांचा समावेश आहे. याशिवाय टाटा इनकम प्लस आर्बिट्रेज ॲक्टिव्ह एफओएफ, आयसीआयसीआय प्रू क्वालिटी फंड आणि कॅनरा रोबेको मल्टी ॲसेट ॲलोकेशन फंड या योजनाही खुल्या होणार आहेत.

एंजल वन निफ्टी ५० इंडेक्स फंड ५ मे रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि १६ मे रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान १,००० रुपयांपासून या फंडात गुंतवणूक सुरू करू शकतात. त्याचबरोबर पुढील आठवड्यात एंजल वन म्युच्युअल फंडाची




आणखी एक नवीन योजना एंजल वन निफ्टी ५० ईटीएफ देखील बाजारात प्रवेश करेल. हा फंड ५ मे रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल. गुंतवणूकदार १६ मे पर्यंत या एनएफओमध्ये गुंतवणूक करू शकतात. या फंडातही गुंतवणूकदार किमान १,००० रुपयांपासून गुंतवणूक सुरू करू शकतात.

टाटा इनकम प्लस आर्बिट्रेज ॲक्टिव्ह फंड ऑफ फंड हा एक ओपन-एंडेड डेट फंड आहे. हा एनएफओ ५ मे रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि १९ मे रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान ५,००० रुपयांपासून या फंडात गुंतवणूक सुरू करू शकतात.

आयसीआयसीआय प्रुडेन्शियल क्वालिटी फंड हा एक ओपन-एंडेड थीमॅटिक फंड आहे. हा एनएफओ ६ मे रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि २० मे रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान ५,००० रुपयांपासून या फंडात गुंतवणूक सुरू करू शकतात.

कॅनरा रोबेको मल्टी ॲसेट ॲलोकेशन फंड ९ मे रोजी सबस्क्रिप्शनसाठी खुला होईल. गुंतवणूकदार २३ मे पर्यंत या फंडात गुंतवणूक करू शकतात. हा एक ओपन-एंडेड मल्टी ॲसेट ॲलोकेशन फंड आहे जो बीएसई २०० टीआरआय (६५), निफ्टी शॉर्ट ड्युरेशन इंडेक्स (२०), सोन्याच्या देशांतर्गत किमती (१०), चांदीच्या देशांतर्गत किमती (५) ट्रॅक करण्यासाठी डिझाइन केलेला आहे. गुंतवणूकदार या फंडात किमान ५,००० रुपयांपासून गुंतवणूक सुरू करू शकतात.